जगभर

# पुन्हा एकदा सिरिया

**चन्द्रशेखर पुरन्दरे**

गेली पाच वर्षे सिरियात हत्याकांड चालू आहे. यात आजवर ५ लाखावर सामान्य नागरिक मरण पावले आहेत. त्याहून जास्त कित्येक लाख बेघर होऊन शेजारच्या देशांत निर्वासित झाले आहेत, होत आहेत. १८ वर्षांखालील सुमारे ८०% सिरियन मुलांवर युद्धाचा अनिष्ट परिणाम होत आहे. ३७ लाख मुले तर संघर्ष काळात जन्माला आली आहेत. बशर असदची राजवट व तिच्याविरुद्ध लोकशाहीची मागणी करणारे विरोधक यांच्यात हा संघर्ष सुरु झाला पण अल्पावधीतच यातून निर्माण झालेल्या अराजकाचा फायदा घेत इसीस (इस्लामिक स्टेट - ISIS) या अति-कडव्या सुन्नी मुस्लीम संघटनेने सिरियाचा मोठा भूभाग बळकावला. या निर्नायकी अवस्थेत उत्तर सिरियातील कुर्द वंशाच्या लोकांनी सिरियातून विभक्त होण्याचा सशस्त्र प्रयत्न सुरू केला.

त्यात या गुंतागुंतीच्या सुंदोपसुंदीत सहा महिन्यांपूर्वी रशियाने असदच्या बाजूने प्रवेश करून मानवी वेदनेत भर घातली. तो हस्तक्षेप जगाला धक्कादायक होता.

तितकाच धक्कादायक निर्णय म्हणजे सिरियातून रशिया अंशत: बाहेर पडत आहे. रशियाचा सर्वेसर्वा पुतीन याने टीव्हीवरील थेट प्रक्षेपणात रशियाच्या परराष्ट्र मंत्री व संरक्षणमंत्री यांच्याबरोबरच्या बैठकीत १४ मार्चला ही घोषणा केली. 'आपल्या लष्कराने सिरियातील उद्दिष्ट प्राप्त केले आहे व असदशी चर्चा करून आपण तेथून मोठ्या प्रमाणात बाहेर पडत आहोत.' १५ मार्चपासून रशियाचे तेथील विमाने आणि सैन्य रशियाला परतूही लागली. तेही टीव्हीवर दाखवण्यात आले. यांचे डामडौलात स्वागत झाले, जणू ती विजयी सेनाच. १५ मार्च ही तारीख महत्त्वाची कारण त्याच दिवशी जिनीवामध्ये संयुक्त राष्ट्रसंघाच्या विद्यमाने सिरियासंबंधी निर्णय घेण्यासाठी बहुराष्ट्रीय बैठक सुरू झाली. त्यामुळे रशियाचे सिरिया सोडणे नाट्यमय झाले.

मुळात रशियाचे किती सैन्य तेथे होते हेच कोणाला माहिती नाही. त्यामुळे अंशत: किंवा मोठ्या प्रमाणात म्हणजे किती हेही माहिती नाही. एका अंदाजानुसार बाहेर पडण्याआधी तेथे रशियाचे ४,००० सैनिक व ५० लढाऊ विमाने असावीत. (बाहेर पडायला सुरुवात झाल्यावरही रशियाचे हवाई हल्ले चालूच आहेत. पण ते प्रामुख्याने इसीसच्या प्रदेशात आहेत, त्यामुळे जगाला ते आक्षेपार्ह नाहीत.)

**थोडक्यात पार्श्वभूमी**

अफगाणिस्तान, इराकमध्ये मोठी मान-हानी जीवित- हानी होऊनही निष्पन्न वजाच झाल्याने, (कदाचित जरूर असूनही) अमेरिका या यादवीपासून बऱ्यापैकी अलिप्त राहिली. ही पोकळी रशियाने सहा महिन्यांपूर्वी हेरली व शिरकाव केला.

असद हा लोक-निर्वाचित राष्ट्र-प्रमुख आहे आणि त्याला उलथण्याचा प्रयत्न गैर आहे असे रशियाचे प्रतिपादन राहिले आहे. असदचा सत्तेत रहाण्याचा दावाही याच भूमिकेवर आहे. त्याच्या मते त्याचे विरोधक हे सगळेच इस्लामी मूलतत्त्ववादी आहेत. वस्तुत: तसे नाही. त्याच्या निषेधातील आंदोलन उभे राहिले ते त्याने आपणहून सत्ता सोडावी व खऱ्या लोकशाहीची स्थापना व्हावी या वैध राजकीय मागणीसाठी; धार्मिक नव्हे. असदला ते करायचे नव्हते; इसीसचा प्रवेश नंतर झाला.

**रशियाचे उद्दिष्ट**

याबाबत गेले सहा महिने अनेक तर्क होत आहेत.

सुन्नी मुस्लीम आतंकवादाचा धोका उर्वरित जगाप्रमाणे रशियालाही आहे. इसीसतर्फे लढणाऱ्या सैन्यात अनेक चेचेन आहेत. ते रशियाचे वर्चस्व न मानणाऱ्या चेचन्या या रशियन प्रांताचे मुस्लीम रहिवासी. ते रशियाला परतल्यास देशांतर्गत असंतोष, विध्वंस वाढणार हे उघड होते.

क्रामिया आणि युक्रेन या नजीकच्या देशांतील कारवाईने रशियाची आंतरराष्ट्रीय प्रतिमा डागाळली. रशिया हा जागतिक शांततेला धोका आहे असा मुख्यत: पश्चिमेचा दावा सुरु झाला. तर, शेजारच्या देशांबरोबरच आपण दूरच्या देशातही प्रभावी आहोत हे जगाला दाखवणे रशियाला महत्त्वाचे होते.

मध्य-पूर्वेच्या संदर्भात आजवर स्थानिक देश व अमेरिका हे दोनच पक्ष तेथील धोरण ठरवत, हे समीकरण बदलण्याचाही हा प्रयत्न आहे, आपण जागतिक महासत्ता आहोत हे रशियाला दाखवायचे आहे.

शिवाय या संदर्भात काही प्रमाणात तरी इसीसवर हल्ले करण्याने पश्चिमेची व्यापार-बंदी थोडी शिथिल होईल असाही अंदाज असावा.

दुसऱ्या महायुद्धाच्या समाप्तीनंतर रशियाने बाहेरच्या देशातील एकमेव आरमारी तळ सिरियात उभारला. तो सुरक्षित राखणे जरुरीचे होते कारण असद पडला तर हा तळ इसीसच्या ताब्यात

जाणे परवडणारे नव्हते. म्हणून इसीस व अंतर्गत वैध विरोधक यांच्यामुळे असद दुबळा होत आहे तर त्याला तात्पुरता तरी पाठिंबा देणे रशियाला आवश्यक वाटले.

या आरमारी तळासारखाच एक हवाई तळही रशियाने सिरियात या हस्तक्षेपादरम्यान उभारला आहे. दोनही तळ, त्यांवरचे सैन्य तेथेच रहाणार. परत, गरज पडल्यास रशियातूनही जास्तीचे सैन्य 'अगदी काही तासात' सीरियाला पाठवण्यात येईल हेही पुतीनने स्पष्ट केले.

आपले लष्कर किती अत्याधुनिक व सुसज्ज आहे हे रशियन जनतेला दाखवणे जेणेकरून पारंपारिक राष्ट्रवादात भर पडेल. रशियाची डळमळीत अर्थव्यवस्था पहाता असा देखावा गरजेचा आहे. म्हणून युक्रेन, क्रामियापाठोपाठ सिरिया.

ज्या प्रकारे सामान्य 'देशभक्ता'ची मान या 'आपल्या' लष्कराच्या करामतीने उंचावली, त्यावरून हे उद्दिष्ट सफल झाले!

उद्दिष्टात असदला पाठिंबा हा अगदीच दुय्यम व आपापत: असा घटक दिसतो.

**इतर घटक**

अरब वसंतातील विविध उठाव पाश्चात्त्य चिथावणीने झाले असा पुतीनचा ग्रह आहे. त्यामुळे सिरियातील असदला झालेला विरोध याच दृष्टीने पाहिला गेला आहे. असद लोक-निर्वाचित असला म्हणजे त्याचे दमन-कांड न्याय्य ठरत नाही याकडे रशियाने हेतुपुरस्सर दुर्लक्ष केले. या जन-आंदोलनांना दडपणे हा एकच मार्ग रशियाला माहित आहे. त्या आंदोलनांच्या प्रतिनिधींशी चर्चा, धोरणात बदल वगैरे पर्यायच विचारात नाहीत. कारण, खुद्द रशियात हीच परिस्थिती येऊ शकते. युक्रेनमधील हस्तक्षेपाने पश्चिमेने लादलेली व्यापारबंदी, तेलाचे उतरते भाव यामुळे सतत तिसऱ्या वर्षी अर्थव्यवस्था खालावली आहे, यावर परदेशी विजयाच्या पोकळ वल्गना हे उत्तर राजवट देत आहे.

एक गोष्ट मात्र या प्रकरणातून स्पष्ट झाली , ती म्हणजे, रशिया अमेरिकेच्या दोन पावले पुढे दिसला. चक्रव्यूहातील अभिमन्यूप्रमाणे अफगाणिस्तान, इराकमधून बाहेर कसे यावे हेच आपल्याला कळले नाही याची जाणीव अमेरिकेला आहे. (तीच वेळ ब्रेझनेवच्या रशियावर अफगाणिस्तानमध्ये आली होती.) सिरियात गेल्यास तीच वेळ परत येईल या आशंकेने अमेरिका दूर राहिली. अगदी परवापर्यंत ओबामांचेही म्हणणे असे होते की आता रशिया सिरियामध्ये दीर्घ-काळासाठी अडकला. पण पुतीनने मर्यादित काळासाठी हस्तक्षेप करता येतो; त्यात आपल्या सैन्याची मानवी हानी व देशाचा खर्चही अगदी कमी होतो हे दाखवून दिले. अर्थात, वर म्हटल्याप्रमाणे राजवट बदलणे हे रशियाच्या सीरियातील हस्तक्षेपामागील उद्दिष्ट कधीच नव्हते - जसे अमेरिकेचे अफगाणिस्तानमध्ये (तलेबान) आणि इराकमध्ये (सद्दाम हुसेन) होते. किंबहुना असदची राजवट चालू ठेवणे हेच घोषित उद्दिष्ट होते. त्यासाठी काही हजार तरी निरपराध बळी पडले व निर्वासित झाले - ही रशियाच्या कारवाईची खरी फलश्रुती. तिची रशिया दखलही घेत नाही.

एका परीने रशियाचे असदच्या विरोधकांवरील हल्ले इसीसच्या पथ्यावरच पडले. स्थानिक शत्रूचा बिमोड रशियाने केला. काट्याने काटा निघाला.

**सद्यस्थिती**

वर म्हटलेल्या जिनीवातील बैठकीत असदची बाजू वेळकाढूपणा करत आहे, असदने सत्ता सोडावी या मागणीवर विरोधक अडले आहेत. बैठकीत इसीस व अल-कईदा नाहीत. त्यामुळे निर्णय झाला तरी प्रत्यक्षात तो येणे साशंक आहे.

रशियाच्या सहाय्याने असदच्या राजवटीला सुमारे ४००० चौ. मैल व ४०० खेड्यांवर परत ताबा मिळाला आहे. हा भू-भाग त्याचे विरोधक किंवा इसीस किंवा अल-कईदा यांच्या ताब्यात होता. (याखेरीज प्रचंड भू-भाग आजही इसिसच्या ताब्यात आहे.) पाल्मिरा हे प्राचीन शहर असदच्या सैन्याने इसीसकडून २७ मार्चला मिळवले. इसीसने तेथील प्राचीन अवशेष तर नष्ट केलेच (अफगाणिस्तानमध्ये तलेबानने बुद्धाच्या मूर्ती फोडल्या तसेच) पण तिथल्या संग्रहालयाच्या ८० वर्षांच्या अधिकाऱ्याला हाल-हाल करून ठारही मारले होते. अशा यशामुळे असदला आता पूर्वीचा संपूर्ण सिरिया आपल्या राजवटीखाली येऊ शकेल अशी आशा वाटत आहे. रशियाचा हेतू स्वत:चे त्या प्रदेशातील हितसंबध राखणे व वाढवणे हा आहे. त्याकरता असद ही अडचण वाटली, तर रशिया असदची तळी उचलणार नाही.

**भविष्य**

यावरील आधीच्या एका लेखात म्हटल्याप्रमाणे सिरियाची तीन किंवा अधिक शकले होणे शक्य दिसते. शिया-बहुल प्रदेश, सुन्नी-बहुल प्रदेश आणि कुर्द लोकांचा प्रदेश. या प्रदेशाचा आराखडा रशियाच्या संमतीने तयारही आहे. त्यांचे (परस्पर व अंतर्गत) 'आदर्श'-वंश-पंथ-अधिष्ठित कमालीचे हिंसक हाड-वैर ते विभक्त झाले तरी चालूच असणार. शिया-बहुल प्रदेश (असदसह किंवा असदशिवाय) रशिया-इराणच्या प्रभावाखाली, सुन्नी प्रदेशासाठी सौदी अरेबियासह सुन्नी राष्ट्रे व इसीस यांच्यात चढाओढ इ.

सामान्य सिरीयनाची होरपळ त्यांच्या खिजगणतीत नाही.

*Email - artnondeco@yahoo.co.uk*
*Website - www.art-non-deco.com*

श्री